RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १५] बुधवार, मे २७, २०२६/ज्येष्ठ ६, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

	पृष्ठे
सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५.— महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश	१-३

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ मे २०२६.

MAHARASHTRA ORDINANCE No. V OF 2026.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOVERNMENT SERVANTS REGULATION OF TRANSFERS AND PREVENTION OF DELAY IN DISCHARGE OF OFFICIAL DUTIES ACT, 2005.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

२००६ चा महा. २१.

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ याच्या कलम ४ मध्ये,- २००६ चा महा. २१.

(क) पोट-कलम (४) मधील,-

(एक) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः-

"परंतु, जनगणना, २०२७ शी संबंधित काम सुरू असल्यामुळे, सन २०२६ मध्ये करण्यात येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या दिनांक ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी करण्यात येतीलः";

(दोन) विद्यमान परंतुकातील, "परंतु" या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (४क) वगळण्यात येईल.

निवेदन

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (२००६ चा महा. २१), हा शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियमित करण्यात आला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ४ अन्वये, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, सामान्यपणे, वर्षातून एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतील अशी तरतूद आहे.

२. संपूर्ण भारतात जनगणना २०२७ करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात जनगणना २०२७ चा पहिला टप्पा म्हणजेच, घरांची यादी व गृह गणना दिनांक १६ मे २०२६ पासून १४ जून २०२६ पर्यंत करण्यात येत आहे. भारत सरकारने सर्व राज्यांना व संघ राज्यक्षेत्रांना, जनगणना २०२७ साठी नियुक्त केलेल्या जनगणना कार्याधिकाऱ्यांच्या बदल्या न करण्याची विनंती केली आहे. म्हणून, जनगणना २०२७ चा पहिला टप्पा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी, सन २०२६ या वर्षामध्ये करावयाच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या, दिनांक ३० जून, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी केल्या जातील, अशी तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा, अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

जिष्णु देव वर्मा,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक २७ मे २०२६.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्ही. राधा,
शासनाच्या अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.